# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२-२९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. ५३-२२** **दिनांक १६/०२/२०२२**

**०९ लाख ५० हजार रुपये किंमतीचा प्लास्टिक-दाना चोरी करणा-या टोळीस १२ तासाच्या आत अटक करुन संपुर्ण मुद्देमाल हस्तगत.**

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ९.२.२०२२ रोजी रात्री १०:३० वा. ते दिनांक १०.२.२०२२ रोजीच्या सकाळी ०७:०० वाजताच्या दरम्यान फिर्यादी यांच्या कंपनीतील प्लॅस्टिक दाना ठेवलेल्या गाळ्याचे शटरचा टाळा कुणीतरी अज्ञात चोरटयाने कुठल्यातरी टणक हत्याराने तोडुन त्यावाटे कंपनीत प्रवेश करुन ०९,५०,७५०/- रुपये किंमतीचा प्लास्टिक दाना घरफोडी चोरी करून नेलेबाबत वालीव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. I १६३/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे घटनास्थळावरुन तांत्रिक गोष्टींचा आधार घेत व गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे सदर गुन्हयाचा तपास करुन आरोपीत नामे. १) मो. यासीन सुखारी सिध्दीकी रा. नालासोपारा पुर्व २) तबारक हुसेसन बशीर ईद्रीसी रा. नालासोपारा पुर्व ३) मो.अजमल मो.अस्लम ईद्रीसी रा.नालासोपारा पुर्व ४) सलीम किताबुल्ला सिध्दीकी रा. दहिसर यांना सदर गुन्हयात अटक करुन गुन्हयातील ०९,५०,७५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल व गुन्हयात वापरण्यात आलेला ८,०००००/- रुपये किंमतीचा आयसर टेंम्पो असा एकुण १७,५०,७५०/- रुपये किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, पोना. सचिन दोरकर, किरण म्हात्रे, राजेंद्र फड, सतिष गांगुर्डे, पो.अंम. गजानन गरीबे, सुर्यकांत मुंढे, सचिन खताळ, जयवंत खंडवी यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.


कैलास
पोलीस